# प्रल्हाद अक्कानवरू खूनप्रकरणी तिघांना अटक

■ आपण जुन्या भांडणाच्या कारणावरून प्रल्हाद अक्कानवरू यांचा खून केल्याची कबुली दिल्याची माहिती नूतन जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. एस. टी. राठोड यांनी लोकमतशी बोलताना दिली. लातूर/चाकूर : पूणे आणि नागपूर विभागाचे सीआयडीचे अधीक्षक प्रसाद अक्कानवरु यांचे वडील प्रल्हाद अक्कानवरु (७५) यांचा ५ एप्रिल २०१६ रोजी खून झाला होता. याप्रकरणी पोलीस पथकाने तिघांना अटक केली आहे. एकास नळेगाव तर दुसऱ्यास पुणे जिल्ह्यातील राजगुरुनगर येथून अटक केली आहे. आपणच प्रल्हाद अक्कानवरू यांचा खून केल्याचे या आरोपींनी कबूल केले आहे.

चाकूर शहरातील बोथी रोड येथे नंदकुमार अक्कानवरू यांचे किरणा दुकान आहे. या दुकानासमोरच्या ओट्यावर प्रल्हाद अक्कानवरू हे ४ एप्रिलच्या रात्री झोपले होते. ५ एप्रिलच्या पहाटेच्या सुमारास अज्ञात व्यक्तीने त्यांचा खून केल्याची घटना उघडकीस आली. सीआयडी विभागाच्या पुणे-नागपूरचे अधीक्षक प्रसाद अक्कानवरु यांच्या वडिलांचा खून झाल्याने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली होती. या प्रकरणी चाकूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर, पोलिसांनी तपास कार्य सुरु ठेवले. आणि तिघा आरोपींच्या मुसक्या आवळण्यात पोलीस पथकाला यश आले.